# विद्या विकास मंडळ

रामकृष्ण महादेव साळगावकर उच्च माध्यमिक विद्यालय

मडगाव गोवा

## PRELIMINARY Exam, JANUARY 2024

दिनांक : १९/०१/२०२४ विषय : मराठी (द्वितीय भाषा) एकूण प्रश्न : ४२

इयत्ता : बारावी

गुण : ८० वेळ : २.३० तास

---

सूचना : १.शुद्धलेखनाचे नवीन नियम पाळावेत.

२. उजवीकडील अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.

3. प्रश्नांचे क्रमांक स्पष्ट लिहा.

### विभाग १. - व्याकरण

खालील शब्दांची भाववाचक नामे लिहा.

प्र. 1. माता (1)

प्र . 2. श्रीमंत (1)

प्र . 3. शांत (1)

खालील शब्दांची विशेषणे लिहा.

प्र. 4. कष्ट (1)

प्र. 5. रंग (1)

प्र. 6. माया (1)

खालील शंब्दांचे विरूद्धार्थी शब्द लिहा.

प्र. 7. सुंदर (1)

प्र. 8. सत्य (1)

प्र. 9. प्रकाश (1)

खालील शब्दांचे लिंग बदलून लिहा.

प्र. 10. शिक्षक (1)

प्र.11 . लेखक (1)

प्र.12 . गाय (1)

खालील शब्दांचे वचन बदलून लिहा.

प्र. 13. खोली (1)

प्र. 14. चिमणी (1)

प्र.15. टोपली (1)

खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांच्या जाती लिहा. (4)

प्र. 16. एवढा प्रेमळ परिसंवाद संपन्न झाल्यावर पाहुणे मंडळी हिंडायला बाहेर पडली आणि मी त्यांच्या जेवणाची व्यवस्था करण्यास गुंतलो.

## विभाग २ - गद्य

खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा. ( गद्य ) (3)

प्र.17. काझिरंगा अभयारण्यातील फॉरेस्ट बंगला कसा होता?

प्र.18. आशूला अपघात कसा झाला?

प्र.19. श्यामच्या शाळेच्या आवारांतली आंब्याची झाडे कशी दिसत होती?

खाली दिलेली वाक्ये योग्य पर्याय निवडून पूर्ण करा.

20. नावे सर नेहमी म्हणायचे "एकाच उद्देशावर आपली ऊर्जा केंद्रित केली की ................. (1)

(1) वाट उजळायला सहकार्य होतं

(2) तिचे बळ वाढते, ते उद्दिष्ट सहजगत्या प्राप्त होते

(3) जीवन प्रवासाचा मूलाधार ठरतं

21. कष्टाच्या जोडीला आशा, उत्साह जोम तरतरी हे सर्व गुण असल्याशिवाय ............. (1)

(1) यत्नदेवाच्या पूजेची सांगता होत नाही.

(2) नवजीवनाचा संचार शरीरात होत नाही.

(3) सद्तत्त्वाचे अधिष्ठान होत नाही.

22. आईने दळून ठेवलेले पीठ यमुनाबाईच्या घरी पोचवितो आणि ........................... (1)

(1) "ताईला भात, वरण, भाकरी देतो."

(2) "तसाच माधुकरी मागून मी लवकरच परत येतो?"

(3) "घरी येऊन गोपूला खेळवतो."

खालील वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा. ( गद्य ) (5)

प्र. 23 "अन्न आलंच नाही, मग जाणार कुठं"

अथवा

"तर त्यावेळी शंभर रुपये द्यावे लागतील."

खालील प्रश्नाचे उत्तर ७ ते ८ ओळींत लिहा . ( गद्य )

प्र. 24. आशुचे नाव 'कुणाल' असे का ठेवले नाही? (5)

अथवा

रावांच्या घरी फुललेल्या आनंदाचे वर्णन लेखकाने कसे केले आहे.?

## विभाग ३ पद्य

खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा. (पद्य) (3)

प्र.25. देखण्या हातातून घडणारे कार्य कसे असते?

प्र.26. 'गुरुमहिमा' या कवितेचे कवी कोण?

प्र. 27. कवी ना. धो. महानोर यांना केव्हा गीत गावेसे वाटते?

खाली दिलेल्या कवितेच्या ओळी योग्य पर्याय निवडून पूर्ण करा (3)

28. अशा कशा ज्याने त्याने.......................

29. फाटकी ही झोपडी.......................

30. उभ्या पिकासारखं..........................
(गाडल्या उमेदी; वाट का पाहावी; काळीज माझे; वाऱ्यावर डुलावं; दबा धरून बसावं)

खालीलपैकी ओळींचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा (पद्य) : (5)

31. विवेकाची ठेल ओल। ऐसे बोलावे कीं बोल
आपुल्या मतें उगाच चिखल। कालवूं नको रे ||2||
किंवा
सरला आहे म्हणायचं
की भरला आहे म्हणायचं?
तुम्हीच ठरवा!

खालील प्रश्नाचे उत्तर ७ ते ८ ओळींत लिहा (पद्य) : (5)

32. 'संतकृपा जाली' या अभंगातून बहिणाबाईंनी वारकरी पंथातील संतांचे कार्य कसे स्पष्ट केले आहे?
किंवा
'देखणे ते चेहरे' या कवितेत कवी बा. भ. बोरकर यांनी मानवी सौंदर्य खुलविणाऱ्या गुणांचे वर्णन कसे केले आहे?

## विभाग ४ - लेखन

खालील दिलेल्या वाक्प्रचारांचा योग्य पर्याय निवडून लिहा (4)

33. पोटात कावळे ओरडणे -
(गोळी घालणे; प्रभाव पाडणे; खूप भूक लागणे; सावध होणे; लाचार होणे)

34.) बार टाकणे -
(गोळी घालणे; खूप भूक लागणे; सावध होणे; लाचार होणे; प्रभाव पाडणे)

35. ताटाखालचं मांजर होणे -
(गोळी घालणे; लाचार होणे; सावध होणे; प्रभाव पाडणे; खूप भूक लागणे)

36. छाप पाडणे -
(गोळी घालणे; लाचार होणे; प्रभाव पाडणे; सावध होणे; खूप भूक लागणे)

खालील उतारा वाचून त्याच्या खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

आपल्या देशातील सर्व शेतकरी अनुभवत आहेत की, शेतीचा व्यवसाय म्हणजे एक लढाई आहे. रात्रंदिवस लढाई करणारे हे शेतकरी सैनिक आहेत. मात्र हा लढा त्यांना काय मिळवून देतो हाही एक चिंतेचा आणि चिंतनाचा विषय आहे. आपल्या मनासारखं मन भरून त्यांना मिळालं, असं कधी होत नाही. कारण शेतकऱ्याला जे अनेक शत्रू आहेत, त्यातील महत्त्वाचा शत्रू आहे निसर्ग. अनुभव असा आहे की हा निसर्ग आपल्याला कधीच साथ देत नाही. ज्यावेळी पाऊस यायचा त्यावेळी तो येत नाही आणि नको असताना येऊन आपल्या झोळीत नासधूस टाकून जातो. या शत्रूशी लढा देऊन, त्यावर मात करून आपल्या शेतीतून उत्पन्न काढायचं म्हणजे मोठंच कठीण काम आहे. त्यांचा दुसरा शत्रू आहे आपल्या बाजारपेठा, आणि तिसरा शत्रू आहे आपले आयात-निर्यातीचे सरकारी धोरण. आधीच आपल्या देशात पिकणाऱ्या शेतमालाची सरकार आयात करतं आणि निर्यातीवर मात्र बंधने असतात. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हाती पैसा येत नाही, आणि आजच्या काळात पैशावाचून कोणतीच कामे होत नाहीत.

37. शेतकऱ्यांसाठी चिंतेचा विषय कोणता आहे? (1)

38. निसर्गाला शेतकऱ्यांचा महत्त्वाचा शत्रू असे का म्हटले आहे ? (2)

39. शेतकऱ्यांचा तिसरा शत्रू कोणता? (2)

40. महालक्ष्मी उच्च माध्यमिक विद्यालय, पणजी येथे पार पडलेल्या 'प्रजासत्ताक दिना'चा वृत्तांत 8 ते 10 ओळींत लिहा. (5)

41. 'गोव्यातील खाण व्यवसाय' या विषयावर दोन मैत्रिणी/मित्रांमधील संवादलेखन सुमारे 10 ते 12 ओळींत लिहा. (5)

प्र. 42 खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे पंचवीस ओळींचा निबंध लिहा (10)

(i) पाणी नसते तर ?

(ii) प्लास्टिकचा भस्मासुर

(iiii) रस्त्याचे आत्मवृत्त

(iv) माझा आवडता चित्रपट

(v) भारताचे राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम

*********